दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११३ वा रविवार दि.०६ ऑक्टोबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## निवडणूक घोषणा ते निकाल जाहीर करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचे सूक्ष्म नियोजन करावे- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर :- आगामी विधानसभा निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि नोडल अधिकारी यांनी निवडणुकीच्या घोषणेपासून ते मतदानाचा निकाल जाहीर करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाहीचे सूक्ष्म नियोजन करावे. निवडणूक कामाला प्राधान्य देऊन यामध्ये कोणताही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शुक्रवारी आयोजित सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी,




प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ यांच्यासह सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार व जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात व्यापक मतदार जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. विशेषतः गत लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या गावात, मतदान केंद्रावरील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. याबाबतचा कृती आराखडा तयार करून जिल्हास्तरीय स्वीप कक्षाला सादर करावा. नवीन मतदान केंद्रांची निर्मितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे मतदान केंद्रामध्ये बदल झाला असल्यास त्या मतदान केंद्रावरील मतदारांना याबाबत माहिती द्यावी. यासाठी ग्रामसेवक, तलाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यावर जबाबदारी द्यावी. मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधांची उपलब्धता करून देण्याबाबत आतापासूनच पूर्वतयारी करून ठेवण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. विधानसभा निवडणूक प्रक्रिया शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. निवडणूक कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कार्यवाही केली जाईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. प्रारंभी जिल्ह्यातील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या मतदारसंघातील पूर्वतयारीबाबत पीपीटीद्वारे सादरीकरण केले. तसेच उपजिल्हा निवडणूक निणर्य अधिकारी डॉ. कदम यांनी जिल्हास्तरावरून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली व मतदानासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

## मतदार संघातील शेतकऱ्यांसाठी ७० कोटींचे अनुदान शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार; क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी शब्द पाळला

**अतिवृष्टीचे अनुदान आठवडाभरात शेतकऱ्यांच्या खात्यावर; क्रीडामंत्री संजय बनसोडे यांची माहिती**

उदगीर / प्रतिनिधी :- उदगीर तालुक्यात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीने तालुक्यातील ३७ हजार दोनशे सोळा हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते यावेळी शेतकरी बांधवांच्या पाठीशी महायुतीचे सरकार खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही उदगीर - जळकोट मतदार संघाचे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली होती. महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या दि. ०४ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोबत घेऊन उदगीर तालुक्यातील लोहारा सर्कलमधील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली होती. यावेळी शेतकरी बांधवांना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी आश्वासन देऊन तो शब्द क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी पाळला असून उदगीर जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना सप्टेंबर मधील अतिवृष्टीचे तब्बल ७० कोटी रुपयाचे अनुदान मंजूर करण्यात आले



असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. सप्टेंबर, २०२४ या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यात अतिवृष्टी/पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कटिबध्द होते. त्या अनुषंगाने उदगीर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ५१ कोटी तर जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी १९ कोटी असे एकुण मतदार संघासाठी ७० कोटी रुपायांचे सप्टेंबर, महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनुदान लवकरच प्रशासनाच्या वतीने पुढील आठवड्यामध्ये संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यांवर अनुदान वर्ग करण्यात येणार असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे. यामुळे शेतकरी बांधवांनी ना.संजय बनसोडे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# वाढीव पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा ना बच्चू यांच्या शुभहस्ते संपन्न.

चाकूर / प्रतिनीधी :- चाकूर शहराच्या सर्वांगीन विकासाच्या बाबतीत निधी कमी पडू देणार नाही असे प्रतिपादन चाकूर येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या शुभारंभ प्रसंगी दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी येथे शुक्रवारी केले. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत चाकूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते शुक्रवारी रात्री करण्यात आले. त्याप्रसंगी बोलत असताना रस्ते झाले म्हणजे विकास नाही झाला. तर त्या रस्त्यावरून चालनाऱ्या मानसाच्या मनगटाचा विकास झाला पाहीजे,मतासाठी नेते बोलत नाहीत,पण आम्ही मताची पर्वा नाही करत म्हणून बोलतो,जनताच माझा नेता आहे,माझा दूसरा कोणी नेता नाही, असेही यावेळी बच्चू कडू यांनी ठणकावून सांगितले.आज आपल्या महाराष्ट्रामधे श्रीमंती आणि गरिबीमध्ये दरी मोठया प्रमानात जुंपली असून श्रीमंताची आणि गरिबाची शाळा असे समीकरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर चालणारी माणसं ताकदवान झाली






पाहिजेत. धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याला महत्त्व आले पाहिजे आसे आ.बच्चू कडू म्हणाले आज रोजी संपूर्ण चाकूर वासीयांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आसुन,प्रामुख्याने मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या तिन मूलभूत गरजा आहेत. यासाठी प्रत्येकाचीच धडपड सुरू आसुन एकीकडे महागाई वाढत असताना घरकुलासह इतर योजनांतील अनुदानाची रक्कम वाढायला हवी. यासाठी एकत्रितपणे आवाज उठविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी येथे शुक्रवारी केले. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार बाबासाहेब पाटील होते.मंचावर भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, 'प्रहार'चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ चौगुले, नगराध्यक्ष कपिल माकणे, सोसायटीचे चेअरमन डॉ. गोविंदराव माकणे, मुख्याधिकारी प्रतीक लंबे, उपनगराध्यक्ष अरविंद बिरादार, गटनेत्या हिरकणाबाई लाटे महिला व बालकल्याण सभापती शबाना सय्यद, माजी नगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती मिलिंद महालिंगे, पाणीपुरवठा सभापती भागवत फुले,मुज्झमील सय्यद, सुजाता रेड्डी, साईप्रसाद हिप्पाळे, शाहीनबानू सय्यद, ज्योती शिवदर्शन स्वामी, गंगूबाई गोलावार, नितीन रेड्डी, आत्माराम डाके, ड. युवराज पाटील, संगमेश्वर लाटे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविकात नगराध्यक्ष अध्यक्ष कपिल माकणे यांनी अडीच वर्षांमध्ये केलेली कामे व पुढील अडीच वर्षांमध्ये होणाऱ्या कामांचा लेखाजोखा मांडला ही योजना मंजुरीसाठी आ. बच्चू कडू यांची मदत झाली.आमदार पाटिल यांचीही मदत झाली त्यामुळेच चाकूर शहराला पुढील ५० वर्षांत पुरेल अशी ही पाणीपुरवठा योजना असल्याचे सांगून ७० लाख लिटर्स क्षमतेचे जलशुद्धीकरण येथे होणार आहे. शहराला वीस लाख लिटर पाण्याची गरज आहे. ही योजना एक वर्षात पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.






## चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत काटगाव, गंगापूर, बोरी येथे ऊस लागवड, ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा

लातूर / प्रतिनिधी :- विलास सहकारी साखर कारखाना, निवळीच्या वतीने चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी काटगाव, गंगापूर, तर दि. ९ ऑक्टोबर रोजी बोरी येथे व्हि.एस.आय.पुणे येथील ऊस तज्ञाव्दारे पुर्व हंगामी ऊस लागवड व ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळेंचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावर्षी पावसाचे प्रमाणे चांगले झाले आहे, परतीचा पाऊसही चांगल पडला यामुळे मांजरा नदीवरील धरणे, बंधारे यांच्यासह सर्वच ठिकाणी जलसाठा वाढला आहे. या अनुषंगाने विलास सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रात ऊस लागवड करणे सोयीचे व्हावे यासाठी सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने कारखान्याच्या वतीने पुर्व हंगामी ऊस लागवड व ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळा आयोजीत करण्यात आल्या आहेत. या कार्यशाळेत डॉ. आशोक कडलग प्रमुख शास्त्रज्ञ (पीक उत्पादन व संरक्षण) वसंतदादा शुगर इन्सिटट्युट, पुणे, डॉ. अभिनंदन पाटील शास्त्रज्ञ (कृषिविद्यावेत्ता) वसंतदादा शुगर इन्सिटट्युट,पुणे, डॉ. जी.एस.कोटगीरे शास्त्रज्ञ (वनस्पती रोग शास्त्र विभाग) वसंतदादा शुगर इन्सिटट्युट पुणे सखोल असे मार्गदर्शन करणार आहेत.



ही कार्यशाळा मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वा. काटगाव येथील हनुमान मंदीर सभागृहात होईल त्यानंतर सायंकाळी ५ वा. गंगापूर येथील विठ्ठल रुक्मीणी मंदीर सभागृहात होईल तसेच दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वा. बोरी येथील विठ्ठल रुक्मीणी मंदीर सभागृहात होईल. पुर्व हंगामी ऊस लागवड व ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळेस सर्व ऊस उत्पादक शेतकरी बंधुनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी केले आहे.

## संपादकीय....

# गोंडवानाची राणी दुर्गावती

राणी दुर्गावती यांची आज ५ ऑक्टोबर रोजी ५०० वी जयंती आहे. राणीच्या सत्तेखालील दिवस म्हणजे गोंडवाना राज्याचा सुवर्णकाळ होता, असे म्हटले जाते. गोंड ही मध्य भारतातील एक जनजाती असून मध्ययुगीन काळात गोंडवाना हा भारतातील एक मोठा भूप्रदेश होता.आजच्या विदर्भ, छत्तीसगड व मध्य प्रदेश बरोबर याच्या सीमा जोडलेल्या होत्या. या गोंडवाना राज्यावर राजगोंडांचे राज्य होते. या प्रदेशात गोंड आदिवासी हा प्रबळ समुदाय आहे, गोंडवाना हे नावसुद्धा गोंडी लोकांच्या नावावरूनच पडले आहे. सध्या गोंडवानाच्या आसमंतात त्यांच्या लाडक्या विरांगनेबद्दल आदर, अभिमानाची आभा जणूकाही व्यापून राहिली आहे, असं वाटतंय.

गोंडवानातील माहोबाचे राजा कीर्ती सिंह हे चंदेल या राजपूत घराण्यातील होते.कालिंजर किल्ल्यात दुर्गाष्टमीच्या दिवशी त्यांच्या घरी त्यांची लेक जन्माला आली म्हणून तिचे नाव दुर्गावती ठेवण्यात आले. आणि हे नाव अगदी सार्थक ठरले. दुष्टांचे निर्दालन करून सज्ञनांचे रक्षण व सन्मान वाढवणारी राणी दुर्गावतीचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. एकुलती एक मुलगी होती, वडिलांची फार लाडकी होती. लहान वयापासून तिने आपल्या पित्याच्या छत्रछायेत उत्तम प्रशिक्षण घेतले, धनुष्यबाण चालविणे, तलवारबाजी करणे, शिकार करणे या सर्वांची तिला आवड होती. विशेष म्हणजे ती दोन्ही हातांनी तलवार चालवू शकत असे.माहोबाच्या राज्याच्या शेजारीच गड मंगला राज्य होते. या राज्याचा राजा संग्राम शहा गोंड जमातीचा होता. त्याचा मुलगा दलपत याच्याशी दुर्गावतीचे लग्न झाले. त्यांना मुलगा झाला त्याचे नाव वीर नारायण होते. दुर्दैवाने वीर नारायण चार वर्षांचा असतानाच दलपतचा मृत्यू झाला, पण राणी दुर्गावती डगमगली नाही. छोट्या वीर नारायणचा राज्याभिषेक केला आणि त्याच्या नावाने ती स्वतः राज्यकारभार करू लागली.

चितोड, मेवाड, गोंडवाना अशी काही राज्ये सोडली तर आजूबाजूला सगळी मुघल राज्ये होती. आता हे राजे आपले राज्य बळकावण्याचा प्रयत्न करतील याची तिला कल्पना होती, म्हणून तिने सर्वप्रथम सैन्याची फेररचना केली. २० हजार घोडेस्वार १ हजार हत्ती व मोठ्या प्रमाणावर पायदळ होते. त्यामध्ये महिला सेनेचाही अंतर्भाव होता. याशिवाय ५२ गड तिच्या ताब्यात होते. माळवा प्रदेशातील बहादूर शहा आणि मीआणा अफगाण यांचा पराभव केल्याचे उल्लेख इतिहासात सापडतात. ती उत्तम प्रशासक होती. राज्यात सर्व थरांतील लोकांमध्ये तिचा वावर असे. प्रत्यक्ष त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेत असे. जेव्हा तिने शेतकर्यांच्या अडचणी पाहिल्या, तेव्हा राज्यामध्ये अनेक ठिकाणी विहिरी आणि तलाव याचे बांधकाम केले. त्यामुळे राज्यामध्ये पाण्याची कमतरता कधीच जाणवली नाही. अजूनही जबलपूरमध्ये राणी तालाब, आधार तालाब, चौरी तालाब आपल्याला पाहायला मिळतात. असे म्हणतात तिचे राज्य इतके समृद्ध होते की प्रजा सुवर्ण मुद्रांमध्ये किंवा हत्तीच्या रूपात कर देत असे.

राणी दुर्गावती जणू काही सर्वगुणसंपन्न होती, रुपवती होती तितकीच बुद्धिमान होती. तिच्या राज्यात कला व साहित्य क्षेत्रासाठी चांगले दिवस होते. तिच्या दरबारात मेगा सिंह उईका, छन्ना सिंह मडावी, पद्मनाभ भट्टाचार्य असे विद्वान होते, ज्यांनी दुर्गा मां, यायल, गोंडवाना वारी, दुर्गावती विलास समयालोक, वीरचंपू अशा साहित्य रचना केल्या. महेश ठाकूर, रघुनंदन दामोदर ओझा, भाव सिंह, राजनेगी असे अनेक कवी तिच्या दरबारात होते. लहानपणी अनेक वेळा ती राजकुमाराच्या वेशात शिकारीला जात असे. तसेच स्वतः राज्य करताना पुरुष वेशात फिरत असे, लढाईच्या वेळीसुद्धा पुरुष वेश परिधान करत असे.

अशा रूपवान, कर्तबगार दुर्गावती राणीचे सर्वत्र कौतुक होत होते. तिची कीर्ती अकबर बादशाहपर्यंत पोहोचली. एक स्त्री असून अशी कारकीर्द करणार्या विरांगनेला अकबराने प्रस्ताव पाठविला की, राणीने आपला प्रिय सफेद हत्ती व आपला विश्वासू अधिकारी-वजीर आधार सिंह यांना भेट म्हणून पाठवावे. राणीने अर्थातच हा प्रस्ताव धुडकावून लावला. आणि १५६४ मध्ये युद्धाला सुरुवात झाली. अकबराने आपल्या आसिफ खान नावाच्या सरदाराला राणी विरोधात युद्ध करण्यासाठी पाठविले. पहिले युद्ध सिरमौर पासून उत्तरेला काराबाग येथे झाले, दुसरे युद्ध सीरमौर येथे झाले व तिसरे युद्ध गड मांडला मध्ये झाले. या तिन्ही युद्धात आसफखान पराजित झाला. चौथे युद्ध नर्रई मध्ये झाले. हे क्षेत्र दुर्गम डोंगरांचे होते, डोंगरांमध्ये मोठा नाला होता, एके रात्री या नाल्याचा बांध आसफखानच्या सेनेने तोडला. त्यामुळे दुथडी भरून वाहाणारा नाला राणीच्या सेनेला पार करता येईना. आसफखान जवळ मोठे सैन्य होते तर राणीकडे मात्र जेमतेम पाचशे सैनिक होते. हिंमत न हरता राणी त्वेषाने लढू लागली. ते पाहून सैनिकांचे पण मनोबल वाढले व त्यांनी निकराचे युद्ध सुरू केले.

पण यावेळी राणीला बाण लागून ती जखमी झाली. तेव्हा तिने आपल्या विश्वासू सैनिकाला आपला वध कर म्हणून सांगितले. पण त्या सैनिकाला हिंमत होईना, त्याचे हात थरथरू लागले. तेव्हा शत्रूच्या हातून मरण येऊ नये म्हणून राणीने स्वतःच्या कट्यारीने स्वतःच स्वतःला मारले, राणी दुर्गावती शहिद झाली. साधारण पंधरा वर्षे तिने राज्य कारभार चालविला.जबलपूर जवळ नर्रई गावाजवळ तिची समाधी आहे. वयाच्या ४०व्या वर्षी तिला मृत्यू आला.

# बाबासाहेबांसोबत रक्ताचं नात नसलं तरी त्यांच्या विचारांचे वारसदार कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर

महाराष्ट्रातील जेष्ठ नेते, लोकप्रिय उमेदवार, मतदार राजाचा सर्वात जास्त कौल घेणारे, कार्यतत्पर, कर्तव्यदक्ष, विकासाचे मूर्तस्वरूप, मतदारसंघातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या हाकेवर धावत जाणारे, दिवस असो की रात्र, ऊन-वारा-पाऊस कश्याची तमा न बाळगता सर्वांसाठी झटणारे कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर साहेब म्हणजे राजकारणातील राजकारण न करणारा व समाजातील सर्वच स्तरातील लोकांसाठी झटणारा सर्वांचा हक्काचा माणूस. विधानसभेत सर्वात जास्त वेळा निवडून येण्याचा विश्वविक्रम करणाऱ्या कालिदास कोळंबकर यांची नोंद लवकरच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नमूद होणार आहे. माजी राज्यमंत्री आणि विधानसभेचे अध्यक्ष म्हणून ही काही काळ त्यांनी यशस्वी कार्यभार सांभाळला आहे, नायगाव, वडाळा मतदारसंघातील त्यांनी अनेक वर्षे अनेक उपक्रम राबवून आपल्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करून त्याचा कायापालट केला आहे, आपल्या मतदारसंघातील सर्वच जाती-धर्माच्या लोकांसोबत त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले असून कोणाच्या घरी पूजा असो वा वाढदिवस, कोणी आजारी असो किंवा मयत होवो प्रत्येक ठिकाणी कोळंबकर साहेब हजेर., विभागातील कोणत्याही जाती-धर्माचा, पक्षाचा कोणीही जरी आला तरी त्याच काम साहेब माणूस या नात्याने तत्काळ करून देतात, अश्या प्रकारे लोकांच्या सहवासात राहणे, जनसंपर्क साधणे, सर्वांना मदत करणे हा साहेबांचा गुणधर्म.

दादर नायगाव परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची जडणघडण होऊन तिथूनच चळवळीची सुरुवात झाली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या चळवळीत कोकणातील भंडारी समाजाचे मोठे योगदान आहे, गुहागर तालुक्यातील पि. के.बोळे, भास्करराव जाधव कजरेकर अशी अनेक नावे घेता येतील ज्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत मोठ योगदान देऊन बाबासाहेबांना साथ दिली तो वारसा जपण्याचं काम आज वडाळा नायगाव विधानसभा क्षेत्रातील कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर साहेब करताना दिसत आहे. बाबासाहेब मुंबईत प्रथम डबक चाळ येथे वास्तव्यास आले असल्याने त्याठिकाणी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तोरणा गेट बांधून बाबासाहेबांच्या आठवणींना उजाळा देण्याचे काम कोळंबकर साहेबांनी केले आहे त्याचप्रमाणे नायगाव जवळील गोकुलदास पास्ता रोड येथे बाबासाहेबांची बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस असल्याने त्या परिसरात त्यांचे येणे जाणे सुरू होत, तसेच बीडीडी चाळ क्र.१५ मध्ये ही सुभेदार सवातकर यांच्या घरी ही बाबासाहेबांच येणे जाणे असे, सध्या सदर परिसरात भीमसैनिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असल्याने बीडीडी चाळीच पुनर्वसन होत असताना परिसरास डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुल असे नाव देण्यासंदर्भात साहेबांनी विधानसभेत प्रस्ताव मांडून तो ठराव मंजूर ही करून घेतला, दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी त्याचा जी.आर. निघाला असून त्याची पूर्तता केली आहे, कोरबा मिठागर वडाळा येथील बाबासाहेबांचा आठ फुटी चौथऱ्यावर आठ फुटी पुतळा बसवण्याचं काम पूर्णत्वास आले आहे, त्याचप्रमाणे नायगाव विभागातील नायगाव सुतितागृह यास त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे नाव देण्याचे व सदर सुतितागृहाचे कायापालट करण्याचे काम ही साहेबांनी केले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबरला देश-विदेशातून भीमप्रेमी बाबासाहेबांना मानवंदन देण्याकरता येत असतात त्यांना अंधारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग म्हणजे बाबासाहेबांची चळवळ त्या चळवळीची धगधगती मशाल कायमची तेवत रहावी या भावनेतून प्रथम दर्शनी भीमज्योत त्या ठिकाणी उभारण्याचं काम कोळंबकर साहेबांनी करून सर्वांसमोर नवीन आदर्श ठेवला आहे, तसेच नायगावचे



अंकुर बुद्धविहार, शिवडीचे जेतवन बुद्धविहार आणि ममता सोसायटीचे बुद्धविहार बांधून देण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे, तसेच अण्णाभाऊ साठे नगर येथे त्यांनी अण्णाभाऊंचा पुतळा बसवला असून त्याची मुंबईतील दुसरा अण्णाभाऊंचा पुतळा म्हणून नोंद झाली आहे. अशी अनेक कामे या विभागात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत रक्ताच नात नसलं तरी त्यांच्या विचारांचे खरे वारसदार हे कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर हे ठरले आहेत, सामाजिक बांधिलकी जपत पोलीस वसाहत मधील पोलीस कर्मचाऱ्यांना राज्यसरकार द्वारे हक्काचे घर मिळवून देण्याचे काम केले.

कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर हे अत्यंत कुशल, कुशाग्र बुद्धी असलेले नेते असल्याने त्यांनी वेळेवेळी आपल्या कौशल्य, बुद्धी व चातुर्यांनी अशक्य ही शक्य करून दाखवले त्यामुळे विभागातील प्रत्येक माणसाच्या हृदयात कोळंबकर साहेबांच्या बद्दल आपुलकी, प्रेम दिसते, २४÷७ सातत्याने जनमानसाच्या सहवासात राहून जनतेसाठी अविरत कार्य करणारा असा एकमेव कार्यसम्राट आमदार म्हणून त्यांची ओळख आहे, २०२४ च्या निवडणुकीत त्यांचे सर्वाधिक वेळा विजयी होणारे आमदार म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होण्याची शक्यता आहे अशी चर्चा त्यांच्या मतदारसंघातील मतदाते करताना दिसत आहे. बाबासाहेबांचा वैचारिक वारसा असा चालू ठेवून विभागात उत्तरोत्तर प्रगती करावी हीच कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर यांना शुभेच्छा.

********

अधिराज्य
+९१ ८०९७३१८९८५
+९१ ९६६४९७८४१९.

# एकलारे सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार-२०२४

आनंदवनाच्या विकासाचे शिल्पकार म्हणूनच डॉ. विकास आमटे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवाने उल्लेख केला पाहिजे. डॉ. विकासभाऊंच्या नावातच चौफेर विकासाचा ध्यास असल्याचं दिसून येतं. भूतलावरील माणुसकीचं बेट म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आनंदवनातून श्रमर्षी बाबा आमटे व स्व. साधनाताई आमटे यांनी कुष्ठरोग्यांना खऱ्या अर्थी माणसाचं जगणं दिलं. दानाने माणूस नादान होतो म्हणून त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविलं. डॉ. विकास आमटे, डॉ. भारती आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे आणि तिसऱ्या पिढीचे दमदार व ध्येयासक्त कार्यकर्ते तेवढ्याच समर्पणाने कार्य करीत आहेत. बाबा आमटे यांच्या भव्य दिव्य स्वप्नांचं मूर्त रूप म्हणजे आनंदवन. पण 'आनंदवन म्हणजे कुष्ठकार्य' एवढीच ओळख जनमानसात रुजलेली आहे. डॉ. विकास आमटे बांनी प्रत्यक्षात त्यापलीकडे जाऊन अंध, अपंग, कर्णबधीर, बेरोजगार, शेतकरी, आदिवासी, निराधार अशा समाजातील उपेक्षित घटकांना न्याय्य, निरोगी आणि अर्थपूर्ण आयुष्य जगण्याची संधी देणारे अभिनव मॉडेल विकसित केलं आहे. डॉ. विकास आमटे यांनी आपल्या दूरगामी नियोजनातून शेती, पाणी, पर्यावरण, उद्योग, शिक्षण, आरोग्य, रोजगार, घर बांधणी, संगीत-नृत्याविष्कार अशा अनेक क्षेत्रांत नानाविध प्रयोग करून अफाट आणि पायाभूत काम आनंदवनात उभं केलंआहे. विशेष म्हणजे, समाजाने नाकारलेल्या साध्यासुध्या माणसांच्या घामातून, कष्टातून हा सृजनात्मक आविष्कार घडविला आहे. आज आनंदवन हे सुख, समृद्धी व समाधानी वृत्तीनं नांदणारं गाव तर आहेच, पण त्याहीपलीकडे गावाखेड्यांच्या सर्वंकष विकासाचं एक जितं जागतं उदाहरणही आहे. बाबाचं स्वप्न जमिनीत रुजविणाऱ्या नि फुलविणाऱ्या डॉ. विकास आमटे यांच्या प्रयोगशील हातांची ही सत्यकथा उभ्या देशाला व समग्र मानवजातीला प्रेरणा देणारी आहे.

**समृद्ध वारसा :**

आज डॉ. विकासभाऊ ७८ व्या वर्षात पदार्पित होत आहेत. माझा आणि विकास भाऊचा परिचय ५८ वर्षापासूनचा. तेव्हा हे दोघेही बंधू नुकतीच मॅट्रिकची परीक्षा देऊन सोमनाथ प्रकल्पावर होणाऱ्या पहिल्या श्रमसंस्कार छावणीच्या कामात ट्रक ड्रायव्हिंग करीत सामानाची ने-आण करीत होते. पुढे दोघेही उच्चशिक्षित पदवीधर डॉक्टर झाले. परंतु डॉ. विकास व डॉ. प्रकाश यांनी सरकारी नोकरीत किंवा खाजगी व्यवसायात न जाता श्रमर्षी बाबा व साधनाताई आमटे यांनी स्वीकारलेल्या समाजकार्याचा वसा स्वीकारला. आपल्या वैयक्तिक जीवनात खाजगीपण न ठेवता डॉ. विकासयांनी सामूहिक जीवनपद्धती अंगिकारली. श्रमर्षी बाबा आमटेंप्रमाणेच डॉ. विकासभाऊंनीसुद्धा आपण केवळ 'एक व्यक्ती' नसून 'एका समष्टीचा भाग' आहोत, ही जाणीव कधीही सोडली नाही. त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये समान अधिकाराच्या तत्त्वाला खूप महत्त्व आहे. डॉ. विकास आमटे जातीभेद, पंक्तीभेद, धर्मवेद, वर्णभेद मानीत नाहीत. म्हणून तर ते सर्वांमध्येच 'भाऊ' म्हणून परिचित आहेत.

**चौफेर विकासाचा ध्यास :**

डॉ. विकास आमटे नावाप्रमाणे विकासाचा व नवनवीन उपक्रमाचा ध्यास घेणारे व्यक्तिमत्त्व आहे. आनंदवनात शाश्वत पाण्याचा शोध, पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून एकमेकांशी जोडलेले सोमनाथ येथील बावीस व आनंदवनातील बारा तलाव, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू निर्माण करण्याचा प्रकल्प, प्लॅस्टीक पुनर्वापर प्रकल्प आणि टायरचा वापर करून बांधलेले बंधारे, पुरातत्त्वीय काळाची साक्ष देणारे हजारो दगडी अवशेष, जैवविविधतेनं नटलेलं ६५ एकरातील घनदाट जंगल, अभयारण्य व स्मृतिवनाची हिरवळ, मियावाकी अटल घनवन, विना लाकडांची आणि विना लोखंडाची टुमदार व घुमटाकार घरकुले, संगीताच्या तालावर दूध, दही, लोणी, तुपाची समृद्धी वाहणारी डेअरी, ट्रायसिकल पासून ते ट्रकची ट्रॉली, रेफ्रिजेटर्स व एअर कंडीशनर्स तयार करणारे अत्याधुनिक वर्कशॉप, दिव्यांगांमध्ये शिक्षण-प्रशिक्षणातून स्वावलंबी जीवनाचा साक्षात्कार पेरणारे कौशल्य तंत्रज्ञान, आनंदनिकेतन महाविद्यालय व कृषी महाविद्यालयातून घडवले जाणारे जीवन शिक्षणाचे संस्कार, दररोजच्या हिंदी, मराठी, इंग्रजी वृत्तपत्रांचे वाचन करून त्यातील महत्त्वपूर्ण लेख प्रयोग घटना व माहितीपर बातम्यांना स्केच पेनने रेखांकित करणे आणि ती सर्व कात्रणे काढून संबंधित फाईलमध्ये लावणे, जगभर - देशभर - राज्यभरातून येणाऱ्या हजारो पत्रांचा मजकूर वाचणे, त्यांची नोंद घेणे तसेच आनंदवनात येणाऱ्या हजारो पर्यटकांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देणे, त्यांना आनंदवन परिवाराची वैशिष्ट्ये समजावून सांगणे, आनंदवन परिवारातील कार्यकर्त्यांचे रुसवे-फुगवे, राग-लोभ-तक्रारींचे समाधानकारक रीतीने निराकरण करणे, सर्व छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांच्या पत्रांना सुंदर अक्षरात आटोपशीर व समर्पक उत्तरे देणे, आनंदवन प्रकल्पात चालणाऱ्या ३० वेगवेगळ्या युनिट्स अंतर्गत १४० प्रकारच्या उत्पादन प्रक्रियेचे व्यवस्थापन पाहणे, श्रमर्षी बाबा आमटेंनी सुरू केलेली सोमनाथची श्रमसंस्कारशिबीरे गतिमान ठेवणे व त्यातून देशभरातील युवाशक्तीला ऊर्जा देणे, एवढ्या प्रचंड व्यापात असूनही नियमितपणे वर्षानुवर्षे आपल्या दैनंदिनीतील नोंदी अपडेट ठेवणे, मेगा किचन सौर ऊर्जा प्रकल्प, जिल्ह्यातील सर्वात मोठ्या बायोगॅस प्रकल्पाचे व्यवस्थापन अशा विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीतून त्यांच्या कल्पकतेची, कुशल संघटनात्मक बांधणीची आणि असामान्य व्यवस्थापन कौशल्याची प्रचिती येते. एकाच वेळेस एवढ्या सगळ्या कामांत निष्णात असणारे डॉ. विकास आमटे यांच्यासारखे बहुआयामी संस्थाचालक माझ्या तरी पाहण्यात नाही.

**स्वरानंदवन आर्केस्ट्रा :**

एवढ्या मोठ्या संस्थेचा व्याप आणि तिचे आर्थिक नियोजन सांभाळणे ही खरंतर तारेवरची कसरत आहे. ऋण काढून सण साजरा करण्याचा विकासभाऊंचा स्वभाव नाही. आनंदवनाच्या आर्थिक विवंचनेतूनच 'स्वरानंदवन'चा उपक्रम २००२ मध्ये जन्माला आला. 'आनंदवन तुमच्या दारी...' या कुसुमाग्रज यांच्या उक्तीनुसार डॉ. विकासभाऊंनी आनंदवनाच्या बाहेर जाण्याचे जाणीवपूर्वक ठरविले. तारुण्यात प्रवेश केलेल्या अंध, अपंग, बेरोजगार, कुष्ठरोगमुक्त युवक युवती, मूकबधीर, कर्णबधीर यांच्या भावी आयुष्यातील स्थैर्य, आत्मनिर्भरता आणि स्वावलंबनाचा विचार करून संस्थेने गेल्या सुमारे २० वर्षांपासून केलेले स्वरानंदवन संगीत रजनीचे कार्यक्रम महाराष्ट्रभर आणि इतर राज्यांतही गाजले आहेत. आतापर्यंत महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या बाहेर गोबा, दिल्ली आणि आंध्र प्रदेशात ३००० पेक्षा अधिक प्रयोग झाले आहेत. दीडशे गुणी कलावंत, अद्ययावत वाद्यवृंद, चित्ताकर्षक डिजिटल विद्युत योजना, कर्णमधुर डिजिटल ध्वनी व्यवस्था, संचासोबत गाणी गाण्यात प्रत्यक्ष डॉ. विकास आमटेंचा सक्रिय सहभाग इत्यादीमुळे स्वरानंदवन संगीत रजनीने लाखो रसिकांची मने जिंकली आहेत. समाजाने ज्यांना स्वीकारायला नकार दिला, त्यांनीच डॉ. विकासभाऊंच्या प्रेरणेतून असा एक कलात्मक आविष्कार साकारला आहे की, जिथे आहे वेदनेचा हुंकार अन सुरेल संगीताचा सुमधुर झंकार! या कलाविष्काराला श्री. अशोक हांडे यांनी 'स्वरानंदवन' हे कलात्मक नाव दिलं. दिव्यांगांचा कलाविष्कार तब्बल दोन तपांपेक्षा अधिक काळ मातेच्या ममतेनं सांभाळतात. ते श्रमर्षी बाबा आमटे व डॉ. विकासभाऊंच्या तालमीत तावून सुलाखून निघालेले व दोन्ही पायांनी पूर्णतः अपंग असलेले संधिनिकेतन प्रकल्पाचे कर्तबगार माजी संचालक श्री. सदाशिव ताजणे. स्वरानंदवनच्या माध्यमातूनडॉ. विकासभाऊंच्या कलात्मक पैलूंची आणि रसिकवृत्तीची ओळख तर होतेच, तसेच डॉ. विकास आमटे दिव्यांगांच्या भावजीवनाशी किती एकरूप झाले आहेत, ह्याचीही प्रचिती अनुभवता येते. अंध, अपंग, मूकबधीर परंतु खऱ्या अर्थाने सक्षम, डोळस, संवेदनशील व गुणी कलावंतांनी हृदयाला भिडणारी, माणुसकीला साद घालणारी अभूतपूर्व व अविस्मरणीय संगीत, नृत्य मैफल 'स्वरानंदवन'च्या माध्यमातून दुमदुमत ठेवण्याचे सारे श्रेय कलाप्रेमी आणि गुणग्राहक डॉ. विकासभाऊंचे !

**जिवाभावाचे सहकारी :**

आनंदवन परिवाराचा एवढा प्रचंड व्याप ज्या जिवाभावाच्या सहकाऱ्यांच्या सहकार्यानेसांभाळला जातो त्यांत डॉ. विजय पोळ, कवीश्वर काका, सीताकांत प्रभू, सुधाकर कडू, सदाशिव ताजणे, अरुण कदम, अशोक बोलगुडेवार, नंदू देवघरे, विजय जुमडे, काष्ठ कलाकार चंद्रमणी, कलावंत शेख गनी खान, अदम्य उत्साहाचं प्रतीक असलेली शकुंतला बारंगे, ग्रीटिंग्ज कलावंत रमेश अम्बू, शिलाई प्रमुख सुमनताई कडू, लेदर उत्पादनातील प्रयोगक्षम कलाकार मणीराम लंजे, चर्मकलावंत नन्यू सोनेकार, तीन तीन चाकी सायकलीचा मास्टर बंडू बंडू येनर येनगुंटीवार, फॅब्रिकेशन उद्योगातील गिरिधर राऊत, पावरलूममध्ये योगदान देणारे दिलीप हेर्लेकर, प्रिंटिंग प्रेस काम पाहणारे गंगा रेड्डी तोडावार, आनंदवनात डेअरीची भरभराट करणारे गजानन बसू, योगशिक्षक दीपक शिव, गबने, मिलिंद, सुधाकर, विजय आणि असे आणखी कितीतरी कार्यकर्ते आहेत. अशा शेकडो गुणी व हरहुन्नरी कार्यकर्त्यांच्या योगदानावर आनंदवनाने आतापर्यंतची वाटचाल यशस्वी केलेली आहे. डॉ. विकास आमटे म्हणजे सर्व कामांत अग्रभागी असूनही सर्व यशाचे श्रेय संबंधित विभागाच्या कार्यकर्त्याच्या पदरात टाकणारा व शेवटी नामानिराळा राहणारा असा अनोखा संस्थाचालक! डॉ. विकासभाऊचं खरं मोठेपण त्यातच सामावलेलं आहे. 'श्रेय नामावलीत मी सर्वांत शेवटी' अशी त्यांची विनम्र भूमिका असते. कारण त्यांचा पिंड हा अस्सल निरलस कार्यकर्त्याचा आहे.



**दुःख उधळावयास आता आसवांना वेळ नाही:**

डॉ. विकास भाऊंना ७८ वर्षांच्या काळात अनेक बऱ्यावाईट प्रसंगांना सामोरे जावे लागले. त्यात श्रद्धेय बाबा, साधनाताईचे दुःखद निधन... त्यानंतर परिवारातील वडीलधारी व्यक्ती म्हणून पडलेली जबाबदारी... आणि आपली सर्वांत लाडकी, कर्तबगार मुलगी डॉ. शीतल आपल्याला कायमची सोडून जाणं...शीतल आपल्यापासून दुरावल्यानंतर डॉ. विकासभाऊ व डॉ. भारती बहिनी बरेच दिवस विमनस्क अवस्थेत होते. अजून ते त्यातून पुरेसे सावरले आहेत, असे वाटत नाही. डॉ. शीतल भाऊंसाठी जीव की प्राण होती. तिच्याशिवाय भाऊ व भारती वहिनींचं असणं आम्हा सर्व कार्यकर्त्यांना असहाय्य व वेदनादायी वाटतं. परंतु काळाच्या पुढे कोणाचंच शहाणपण चालत नाही, जे झालं ते विसरून, गिळून पुढे चालावं लागतं. भाऊंचा व्याप नि पसारा तरी किती मोठा ? समस्या किती भिन्न आणि चित्र विचित्र? समष्टीच्या सुखदुःखाच्या प्रश्नापुढे व्यक्तिगत प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ तरी कुठे? डॉ. विकास भाऊ समष्टीच्या गोतावळ्यात अडकलेलं किंबहुना स्वतःला हरवून टाकलेलं व्यक्तिमत्त्व. अलीकडील अनेक वर्षे सोबत कार्य केलेले जिवाभावाचे साथीदार पितृतुल्य शंकरदादा जुमडे, सौ. सिंधुताई, भाऊ मिस्त्री, बन्सीलालजी, श्री. गोविंदराव, भास्करराव भगत, मोटू मिस्त्री, भाऊचे तानाजी मालुसरे सारखे मित्र गजानन बसू, सुमनताई कडू, स्नेहालयाच्या भारत जोडो अभियानाचे आयोजक श्री. अहिरे, आनंदवनाचे कृषीमंत्री राहिलेले नारायणराव हाके, आनंदवनाचे सच्चे साथीदार एकनाथजी ठाकूर, डॉ. एस. एन. सुब्बाराव आज आपल्यात नाहीत, ह्याची खंत आहे. आनंदवनाच्या वेदनेशी त्यांचे आश्वासक नाते होते. कितीतरी अप्रिय वाटणाऱ्या घटनांना पोटात घालून पुढील वाट कितीही दुर्गम असली तरी ती चालावीच लागेल. श्रद्धेय बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे - 'शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई दुःख उधळावयास आता, आसवांना वेळ नाही...' खरंतर दुःख कुरवाळत बसण्यात अर्थ नसतो.उलट दुःख गिळून जीवनाला धीटपणे आणि तेवढ्याच समरसतेने सामोरे जाणे महत्त्वाचे असते. दुःखाचा हिशेब मांडण्यापेक्षा जगण्याचे अवघड व क्लिष्ट गणित सोडवण्याकडे डॉ. विकासभाऊंचा कल असतो. ही त्यांची जीवनविषयक सकारात्मकता मनाला भावणारी वाटते. डॉ. विकासभाऊ उत्तम लेखक आहेत, हे त्यांच्या 'आनंदवन प्रयोगवन' या अप्रतिम ग्रंथाद्वारे आणि त्यांनी लोकसत्ता मधून लिहिलेल्या 'संचिताचे कवडसे' या सदरावरून स्पष्ट होते. आटोपशीर व समर्पक लिहिण्यात त्यांचा हातखंडा. पण त्यांच्या लिखाणाचा व साहित्याचा परिपोष ते जीवनानुभव घेण्यातून करतात. सामाजिक योगदानातून, चळवळीतून जगण्याला भिडण्यात त्यांना खरा आत्मानंद मिळतो. संस्थेच्या सामाजिक, आर्थिक समस्यांच्या निरगाठीसोडविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

**बहुआयामी व्यक्तिमत्त्व :**

महारोगी सेवा समितीचे सचिव, एक शैलीदार लेखक, उत्कृष्ट प्रशासक, इंग्रजी मराठी हिंदीतील प्रभावी वक्ते, कुशल समाज संघटक, यशस्वी युवा संवादक, नमुनेदार पत्रलेखक, सिद्धहस्त व्यवस्थापक, निष्णात संघटक, पुरातत्त्व संग्राहक, विवेकनिष्ठ व विज्ञाननिष्ठ उपासक, अहर्निश प्रयत्नवादी, बाबा आमटे राष्ट्रीय एकता अभियानाचे अध्यक्ष, अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी, कपार्ट नवी दिल्लीचे भूतपूर्व संचालक, जिद्दीचा जलशोधक, पर्यावरणप्रेमी, निष्णात डॉक्टर, अंतर्मनातील अभियंते, स्वरानंद संगीत रजनीचे सर्जक आणि कलाकार, सामाजिक भान जपणारा दूरदर्शी नेता, श्रेय नामावलीत सतत मागे राहणारा विनम्र कार्यकर्ता, श्रद्धेय बाबांच्या स्वप्नांना साकार करणारा कृतीशील प्रेरक, असे बहुआयामी व बहुगुणी व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. विकास आमटे होय. डॉ. विकासभाऊंच्या हातून महारोगी, दिव्यांगांची सेवा अशीच होत राहो आणि सामाजिक कामातले त्यांचे योगदान असेच वृद्धिंगत होत जावो, ही सदिच्छा. त्यांच्या अखंड ऊर्जेचा, उत्साहाचा आणि चैतन्याचा झरा असाच निरंतर खळाळत राहो आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवाशक्तीला प्रेरणादायी ठरणारी एखादी 'भारत यात्रा' निघावी असे मला वाटते. त्यांनी मनावर घेतल्यास काहीच अशक्य नाही.एकलारे सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलचा भव्य शुभारंभ आणि डॉ. विकासभाऊ आमटे यांचा ७८ व्या वर्षात प्रवेश त्यानिमित्त एकलारे सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने समर्पित जीवन गौरव पुरस्कार-२०२४ने गौरविण्यात येत आहे. हा शुभारंभ रविवार, दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न होत आहे. म्हणून डॉ. विकासभाऊ आमटे यांना हार्दिक शुभकामना. त्यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभो, हीच शुभेच्छा !

**************

प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे
लातूर, मो. ७५१७९८५६९०

# ओबीसींचा भव्य निषेध मोर्चा कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला

**या मोर्चाने वेधले लक्ष**
या भव्य निषेध मोर्चाने कंधार वासियांचे लक्ष वेधले. या मोर्चात सकल ओबीसी समाज बांधवासह बौद्ध व मातंग समाज बांधव हातात निळे, पिवळे झोंडे व विविध घोषवाक्य असलेले फलक घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**विविध घोषणांनी परिसर दणाणला**
यावेळी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर तथा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, ओबीसी योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्या जय घोषणांनी परिसर दणाणला होता.





कंधार / प्रतिनिधी :– ओबीसी संघर्ष योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर झालेल्या भ्याड जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ सकल ओबीसी समाज, लोहा–कंधारच्या वतीने शुक्रवारी, ४ ऑक्टोबर रोजी कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या भव्य निषेध मोर्चाने कंधारवासियांचे लक्ष वेधून घेतले होते.

ओबीसी योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर ३० सप्टेंबर रोजी पुणे येथे काही समाजकंटकांनी भ्याड जिवघेणा हल्ला केला. तसेच त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. या घटनेच्या निषेधार्थ सकल ओबीसी समाज, लोहा–कंधारच्या वतीने माजी जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. सदर मोर्चाला सकाळी ११ वाजता माईचे मंदिर, साठेनगर, कंधार येथून सुरुवात झाली. हा मोर्चा प्रियदर्शिनीनगर, बौद्ध व्दारवेस, छ.शिवाजी महाराज चौक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, उपकोषागार कार्यालय मार्गे कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. त्यानंतर या भव्य निषेध मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. यावेळी अनेक मान्यवरांनी मोर्चाला संबोधित केले. तसेच या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध केला. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून नायब तहसीलदार रेखा चामणर यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

या मोर्चामध्ये ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय पवार, कंधार पं.स.चे माजी सभापती श्रीराम डुबकवाड, कंधार पं.स.चे माजी सदस्य उत्तम चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड.अंगद केंद्रे, कुंभार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीराम तेलंग, माजी सैनिक विकास समितीचे जिल्हाध्यक्ष बालाजी चुकलवाड, वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष वैजनाथ गिरी, आंबुलग्याचे सरपंच प्रतिनिधी माधव मुसळे, नागारवाडीची माजी सरपंच पमलबाई मुंडे, लोहा कृउबा समितीचे संचालक केरबा केंद्रे, लोहा कृउबा समितीचे संचालक केशव तिडके, लोहा भाजप ओबीसी विभागाचे तालुकाध्यक्ष अर्जुन राठोड, लोहा पं.स.चे माजी सदस्य परशुराम वडजे, कंधार पं.स.चे माजी सभापती प्रतिनिधी पंडितराव देवकांबळे, कंधार पं.स.चे माजी उपसभापती भिमराव जायभाये, बंजारा क्रांती दलाचे प्रदेश उपाध्यक्ष सुंदरसिग जाधव, लोहा न.प.चे.माजी नगरसेवक रमेश माळी, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नारायण आंबुरे, लिंगायत समाजाचे नेते बबन हुलसुरे, डॉ.वैजनाथ राठोड, कंधारेवाडीचे सरपंच शंकरर डिघोळे, बाचोटीचे माजी सरपंच संभाजी हसनवाड, माळाकोळीचे उपसरपंच अरूण सोनटक्के, लोहा भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस कृष्णा केंद्रे, मंगरुळचे सरपंच किरण हाके, वडार समाजाचे गोविंद पवार, कंधार खरेदी विक्री संघाचे सदस्य राजीव मुकनर, धावरीचे सरपंच अशोक गित्ते, ॲड.सागर डोग्रजकर, बबन जोंधळे, प्रेमानंद गायकवाड, विहान कदम आदींसह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, सोसायटीची चेअरमन, व्हाईसचेरमन, प्रतिष्ठित नागरिक व असंख्य ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# नवी मुंबईतील असंख्य कार्यकर्त्यांचा वंचित मधे जाहीर पक्ष प्रवेश

वंचित बहुजन अघाडी नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा ऐरोली आणि बेलापूर विधानसभा सर्व ताकदीनिशी लढणार..!
दिलीप (भाई) बंदीचोडे.




नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक ०३–१०–२०२४ रोजी वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने सानपाडा येथील मिलेनिअम हॉल सेक्टर ९ येथे महत्वपुर्ण मिटींगचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रम नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलिप (भाई) बंदीचोडे, तसेच महीला जिल्हाध्यक्ष शिल्पाताई रणदिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमात नवी मुंबईतील भाजप, कांगेसच्या असंख्य कार्यकर्त्यानी वंचित बहुजन अघाडीत जाहीर पक्ष प्रवेश केला ते पुढील प्रमाणे आयु. सुमित्रा उत्तम लांडगे ( भाजप माजी समाजसेवीका ), तसेच कांगेस चे विकास डिंगरे, (संभाजी ब्रिगेड) चे दीपक पहूरकर, ज्ञानेश्वर जाधव सह असंख्य कार्यकर्तेनी वंचित बहुजन अघाडीत जाहीर पक्ष प्रवेश केला, तसेच मुस्लिम समाजाचे सर्वरखान, आणि ए.पी.एम. सी चे इस्माईल छपरबंध, व महाराष्ट्र खाटीक समाज अध्यक्ष, नवी मुंबई मुस्लिम सेवा संघ जिल्हाध्यक्ष शमशुद्दीन मोमीन इत्यादी कार्यकर्त्यांचा सर्व प्रथम वंचित बहुजन अघाडी पक्षात जाहीर पक्ष प्रवेश करून घेतला व त्यांना पुढील नवी मुंबई जिल्हाध्यक्ष यांनी पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष म्हणालेकी येत्या विधान सभेला सामोरे जाण्यासाठी वंचित च्या सर्व कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने वार्ड, विभाग संघटन बांधनी तसेच पोलिंग, बूत संदर्भात महत्वपुर्ण मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात नुकतीच ऐरोली तालुकाध्यक्ष पदी दीपक पहूरकर आणि बेलापूर तालुकाध्यक्षपदी सुनील भोले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार केला व दोन्ही तालुका कार्यकारणी जाहीर झालेल्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार करून कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यावेळी नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे यांनी मोलाचे मार्गदर्शन करून नुकतेच नवनियुक्त बेलापूर तालुका आणि ऐरोली तालुका या दोन्ही कार्यकारणी वंचित बहुजन अघाडीचे राष्ट्रीय नेते : बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकुर यांनी जाहीर केली त्या सर्व कार्यकाणीला पुढील कार्यास मनापासून हार्दिक सुभेच्छा दिल्या. ऐरोली तालुका महासचिव दिपक दाहीजे, तर बेलापूर तालुका महासचिव : गौतम चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल त्यांना पण पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास नवी मुंबई परिसरातील आजी माझी पदाधीकारी व वंचित चे शेकडों कार्यकर्ते उपस्थित होते. भारिप चे वरिष्ठ कार्यकर्ते व साहित्यीक राजेंद्र बनसोडे, तसेच नव नियुक्त बेलापूर तालुका उपाध्यक्ष : कल्याणराव हनवते, संजय झनके, सुभाष बलखंडे, भागीराम साळवे, बेलापूर सचिव दिपक गायकवाड इत्यादीं कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे भारदस्त सुत्रसंचालन बेलापूर तालुका उपाध्यक्ष कल्याणराव हनवते यांनी केले. शेवटी सर्व उपस्थित कार्यकर्त्याचे जाहीर आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# विधानसभा निवडणूकीसाठी काँग्रेस भवन लातूर येथे होणार इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती

लातूर / प्रतिनीधी : – लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपचा दणदणीत पराभव करून काँग्रेसने पुन्हा एकदा लातूरचा गड काबीज केला आहे.आगामी विधानसभा निवडणूकीसाठी लातूर जिल्हयातील काँग्रेसच्या इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या सुचनेनुसार मंगळवार दि. ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे पार पडणार आहेत अशी माहीती लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. लोकसभेच्या यशानंतर काँग्रेसने प्रभावीपणे महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूकांना सामोरे जाण्याची व्यूव्हरचना आखली असून प्रदेश काँग्रेस तर्फे प्रत्येक जिल्यात निरीक्षक पाठवून इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येत आहेत.लातूर जिल्यात प्रदेश काँग्रेसने माजी आमदार रामहरी रुपनवर यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली असून ते मंगळवार दि. ०८ ऑक्टोबर रोजी काँग्रेस भवन लातूर येथ् सकाळी ०९.०० वाजल्यापासून मुलाखती होणार आहेत.लातूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातून विधानसभेसाठी इच्छूक उमेदवारांनी काँग्रेस पक्षाकडे अर्ज दाखल केले आहेत.इतर पक्षापेक्षा काँग्रेस पक्षाने विधानसभेच्या तयारी करण्यात आघाडी घेतली आहे.लातूर लोकसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयाने कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

# महात्मा बसवेश्वरमध्ये नवनियुक्त समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी आणि पर्यवेक्षक प्रा. वनिता पाटील यांचा सत्कार



लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसेश्वर महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयकपदी व प्रा. वनिता पाटील यांची कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि लेखणी देवून सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, समाजकार्य शाखा समन्वयक डॉ. दिनेश मौने, वाणिज्य शाखाप्रमुख डॉ विजयकुमार सोनी, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शीतल येरूळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, दुग्धशास्त्र विभागप्रमुख डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. नितीन वाणी, डॉ. अश्विनी रोडे आणि रत्नेश्वर स्वामी आदींची उपस्थिती होती. डॉ. नल्ला भास्कर रेड्डी हे महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे संचालक असून ते राष्ट्रीय पातळीवरचे बॅडमिंटनपटू आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पंच, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक म्हणून सहभाग नोंदविला आहे. त्याच सोबतच अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद यात त्यांनी शोध निबंध वाचक, बीजभाषक, साधन व्यक्ती म्हणूनही सहभाग नोंदविला आहे. ते पीएचडीचे तज्ज्ञ मार्गदर्शक असून महाविद्यालयीन, विद्यापीठीय अनेक समित्यांमध्ये देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रा. वनिता पाटील ह्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागात मागील ३२ वर्षापासून सेवारत असून विविध महाविद्यालय समित्यावर त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मागील दहा वर्षापासून महिला तक्रार निवारण समितीच्या त्या अध्यक्षा असून अनेक चर्चासत्रे, परिसंवाद यांच्या त्या संयोजिका आहेत. त्याचसोबत बोर्ड परीक्षा, नीट, गएए यांच्या समन्वयक असून महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सक्षम बनवण्याकरिता योगा आणि कराटे याचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना ग्रंथ देणे, त्यांची फीस भरणे त्यांना अन्य विविध प्रकारची मदत करणे हे त्यांचे सामाजिक कार्य चालू असते. त्यांच्या या नियुक्तीबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे आणि सर्व संचालक, महाविद्यालयातील सर्व समन्वयक, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# तुमच्या सुद्धा चिमुरड्याचे डोळे लाल होतात; जाऊन घ्या, यामागची कारणं आणि उपाय.

मुलांचे डोळे खूप मऊ आणि संवेदनशील असतात, त्यामुळे त्यांची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. विशेषत: लहान मुले, जी वारंवार घाणेरड्या हातांनी डोळ्यांना स्पर्श करतात, त्यांच्या डोळ्यांमध्ये संसर्ग आणि बॅक्टेरियाचा धोका वाढतो. यामुळे त्यांचे डोळे खराब होऊ शकतात. मुलांचे डोळे पुन्हा–पुन्हा लाल होण्याची अनेक कारणे असू शकतात. मुलांचे डोळे लाल होण्यामागील कारण काय आहे आणि ते कसे टाळता येईल याबद्दल आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.. मुलांचे डोळे लाल का असतात? मुलांचे डोळे लाल होण्याची अनेक कारणे असू शकतात. सर्वात सामान्य कारण म्हणजे विषाणू, ज्यामुळे डोळ्यांना संसर्ग होऊ शकतो आणि लालसरपणा येतो. याशिवाय बॅक्टेरियामुळे इन्फेक्शनही होऊ शकते, त्यामुळे डोळ्यांना सूज आणि जळजळ होऊ शकते. धूळ, धूर किंवा पाळीव प्राण्यांच्या केसांच्या ऍलर्जीमुळेही मुलांचे डोळे लाल होऊ शकतात. डोळ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे रसायन किंवा धूळ, वाळू इत्यादी कोणत्याही वस्तू आल्याने देखील डोळे लाल होणे आणि जळजळ होऊ शकते. ही सर्व कारणे टाळण्यासाठी मुलांच्या डोळ्यांची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. काळजी कशी घ्यावी हे जाणून घ्या मुलांना डोळे चोळण्यापासून थांबवा : मुलांना समजावून सांगा की त्यांनी पुन्हा–पुन्हा डोळे चोळू नयेत. असे केल्याने डोळ्यांना संसर्ग होऊन जळजळ आणि लालसरपणा वाढू शकतो. घासल्यामुळे त्यांचे डोळे खराब होऊ शकतात. लहान मुलांचे हात वारंवार धुवा : मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी स्वच्छता अत्यंत आवश्यक आहे. त्यांना दररोज हात धुण्याची सवय लावा, विशेषत: खेळल्यानंतर आणि खाण्यापूर्वी. हे संक्रमण आणि बॅक्टेरियापासून संरक्षण करू शकते. दररोज स्वच्छ टॉवेल आणि वॉशक्लोथ वापरा : मुलांसाठी दररोज स्वच्छ टॉवेल आणि वॉशक्लोथ वापरा. यामुळे त्यांचे डोळे स्वच्छ राहतील आणि संसर्गमुक्त राहतील. या सवयीमुळे त्यांचे डोळे निरोगी राहतील. टॉवेल किंवा वॉशक्लोथ्स शेअर करू नका : मुलांना त्यांचे टॉवेल आणि वॉशक्लोथ्स इतर कोणाशीही शेअर करू देऊ नका. असे केल्याने संसर्ग पसरू शकतो. वैयक्तिक स्वच्छता वस्तू वापरणे ही चांगली सवय आहे. मुलांच्या डोळ्यात केमिकलयुक्त काजल लावू नका : लहान मुलांच्या डोळ्यात केमिकलयुक्त काजल लावू नका. यामुळे त्यांच्या डोळ्यात जळजळ, खाज आणि इतर समस्या उद्भवू शकतात. नेहमी नैसर्गिक वस्तू वापरा.



# राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) लीगल सेल अँड. विशाल पाताडेंची महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी निवड



नवी मुंबई/ के. एच. हनवते:– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्ष लीगल सेल नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत असलेले ऍड. विशाल पाताडे यांची पक्षाच्या लीगल सेल महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. पाताडे यांची ३ वर्षांपूर्वी पक्षाने नवी मुंबई लीगल सेल जिल्हाध्यक्षपदी निवड झाली होती. पाताडे यांनी दरम्यानच्या काळात वकील मंडळींची एक चांगली टीम उभी करतं पक्ष संघटन देखील वाढवले त्यासाठी त्यांचे सहकारी वकीलांनी सुद्धा त्यांना योग्य साथ देतं त्यांचे नेतृत्व यशस्वी होण्यासाठी खऱ्या अर्थाने साथ दिली. प्रदेशाध्यक्ष अँड. आशिष देशमुख यांनी पाताडे यांच्या कामाची दखल घेतं त्यांना उपाध्यक्ष पदी बढती दिली. राष्ट्रीय नेते शरद पवार साहेब, जयंत पाटील, खा. सुप्रिया सुळे व जितेंद्र आव्हाड, अँड. देशमुख साहेब यांचे आभार मानले. पदोन्नती मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी घरी आमंत्रण देऊन सत्कार केल्याचे पाताडे यांनी सांगितले. यापुढे असेच कामं मी व माझे सहकारी करतं राहू अशी प्रतिक्रिया ऍ अँड. पाताडे यांनी दिली.

# संतोष सोमवंशीच्या भाषणामुळे अब्दुल सत्तारांचा काढता पाय !

बाजार समिती सभापती व सचिवांच्या राज्यस्तरीय परिषदेत पणन मंत्रालयातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश



पुणे / प्रतिनिधी :– राज्यातील बाजार समिती यांच्या कोणत्याही विकासकामाबाबतच्या प्रस्तावाला मंजुरी देताना राज्यातील पणनकडून पैसे (लाच) घेतले जात असल्याचा आरोप राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी करताच बाजार समिती सभापती व सचिवांच्या राज्यस्तरीय परिषदेतून राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी काढता पाय घेतला. या घटनेमुळे उपस्थित सभापतींनी घोषणाबाजी करत सरकारच्या धोरणांचा निषेध केला.

गुरूवारी पुणे येथे राज्यातील बाजार समितीची राज्यस्तरीय परिषद पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली झाली या परिषदेला सहकार पणन विभागाचे सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीण नाहटा, पुणे पणन कृषी मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम उपस्थित होते. या परिषदेला येण्यास मंत्री सत्तार यांना मुळातच उशीर झाला. त्यामुळे ते कार्यक्रमाला येईपर्यंत राज्यातून आलेल्या वाई, कोल्हापूर, लासलगाव, चाळीसगाव, गोरेगाव, शेगाव आदी ठिकाणच्या बाजार समिती सभापतींनी बाजार समिती विकास कामाचे प्रस्ताव पणन मंत्रालयाकडून मंजूर केले जात नाहीत, असे सांगत पणन मंत्रालयातील भ्रष्टाचारावर बोट ठेवले. तद्नंतर परिषदेचे नियोजित अध्यक्ष, पणन मंत्री अब्दुल सत्तार व्यासपीठावर स्थानापन्न झाल्यानंतर राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी पणन मंत्रालयातील भ्रष्टाचाराबाबत राज्यातील सभापतींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा उल्लेख करीत भाषण सुरू केले. बारा एकचे परवाने देताना पणन मंडळाकडून पैसे घेतले जातात, असा थेट आरोपच सोमवंशी यांनी केला. यावेळी सत्तार यांनी 'कॉट्राव्हर्सी करु नका', असे म्हणत सोमवंशी यांना बोलण्यापासून थांबविण्याचा प्रयत्न केला, मात्र सभागृहात उपस्थित सभापतीनी 'त्यांना (सोमवंशींना) बोलू द्या!', असे म्हणत सोमवंशी यांची जोरदार बाजू घेतली. त्यामुळे माझी मंत्रीमंडळाची शेवटची बैठक आहे, असे म्हणत सत्तारांनी काढता पाय घेतला. यामुळे सोमवंशीसह सर्व उपस्थित उपसभापतीनी 'पन्नास खोके माजलेत बोके' अशा घोषणा दिल्या. सभागृहात मंत्री अब्दुल सत्तारांच्या निषेधाचा ठरावही मंजूर करण्यात आला.

हा राज्यातील शेतकऱ्यांचा अपमानः परिषदेला राज्यातील ३०६ बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव उपस्थित होते. त्यांच्या अडचणी त्यांनी मांडल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मंत्री सत्तार व्यासपीठावर आल्यानंतर केवळ एकाच प्रतिनिधीला बोलण्याची संधी दिली म्हणून बाजार समिती संघाचा उपसभापती या नात्याने आपण बाजार समित्यांचे प्रश्न व अडचणी मांडल्या मात्र त्या सत्तारांनी विरोध दर्शविला राज्यातील सर्व सभापती उपसभापती हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत. सत्तारांनी त्यांचे प्रश्न समजून घ्यायला हवे होते. मात्र सत्य ऐकण्याचे धाडस त्यांच्यामध्ये नसल्याने त्यांनी काढता पाय घेतला व राज्यातील तमाम शेतकऱ्यांचा अपमान केला आहे.

निषेधार्थ सोमवारी बाजार समित्यांचा बंदः परिषदेला राज्यातील ३०६ बाजार समित्यांचे सभापती उपस्थित होते. त्यांनी या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवित सभागृहाबाहेर ठिय्या दिला. पणन मंत्री सत्तारांचे बॅनर फाडले. सरकारच्या निषेधार्थ सोमवारी (दि. ७) राज्यातील बाजार समित्या बंद ठेवण्याचा निर्णय घेतला,.

# किनवट माहुर तालुक्याला मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या सावकारीचा विळखा

ग्रामीण भागातील महिला कर्जाच्या खाईत
फायनान्स कंपन्यांच्या अंदाधुंद कारभारामुळे सर्वसामान्य कुटुंब वैफल्यग्रस्त झाले आहेत, कमी व्याज सांगून अधिक व्याज आकारणे, एखाद्याकडे हप्त्याचे देणे झाले नाही तर त्याचेसोबत कर्मच्याऱ्यांकडुन अनन्वित छळ सहन करावा लागत असुन तोंड दाबून बुक्यांचा मारसहन करावा लागत असल्याने कर्जपुरवठा करणाऱ्या खासगी कंपन्यांना बँकांप्रमाणे नियम व अटी लागू करण्याची गरज असून बचत गटाच्या माध्यमातून वसुली करणारे एजंट कमी शिकलेले असल्याने त्यांच्याकडून अनेक महिला सोबत तसेच महिलांना फसवणुकीच्या प्रकार घडलेले आहेत.



किनवट/शेख शौकत :–किनवट माहुर तालुक्यात १० हुन अधिक वित्त सहाय्य करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्यांचे जाळे घट्ट होत असून किनवट माहुर तालुका मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या विळख्यात सापडला आहे. तालुक्यातील गोरगरीब महिलांना जाळ्यात ओढून त्यांना मायक्रो फायनान्स कंपनी कडून गरजु महिलांना कर्ज वितरित केले जात असुन. त्यांचेकडून अव्वाच्या सव्वा व्याजासह वसुली केली जात आहे महिलांना कर्ज देऊन जणू एक प्रकारे सावकारीच सुरू झाली आहे, अनेक कंपन्याची उलाढाल कोट्यावधींच्या घरात पोहोचली आहे, परिणामी आज घडीला नांदेड जिल्ह्यातील किनवट माहूर तालुक्यात जवळपास ७०टक्के कुटुंबातील महिला कर्जाच्या विळख्यात सापडल्या आहेत, त्यामुळे एक महिला जरी डिफॉल्टर झाली तरच बचत गटांतील सर्व महिलांचे सिविल खराब होण्याचे प्रकार घडत आहेत या वाढत्या सावकारीच्या विळख्यातुन महिलांना मुक्त करण्यासाठी संबंधित यंत्रणेने लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

किनवट माहुर तालुक्यातील ग्रामीण भागात मायक्रो फायनान्स कंपन्यांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे, महिलांचे गट तयार करणे गटांना सोयीस्कर पद्धतीने कर्ज उपलब्ध करून देणे व दिलेल्या कर्जाची हप्त्यापोटी तसेच महिन्या पोटी वसुली करणे हे मायक्रो फायनान्स कंपन्यांची कामे जोमात सुरू आहेत, कर्ज देणे आणि वसूल करणे यासाठी काही तरुण तरुणींना कामावर ठेवण्यात आले आहे, जवळपास ५०० हून अधिक तरुण व तरुणींना या मायक्रो फायनान्स कंपनीकडून रोजगार उपलब्ध झाला असला, तरी त्या कर्मचाऱ्यांचे वेतन किनवट माहुर तालुक्यातील महिलांकडून व्याजाच्या स्वरूपात वसूल केले जात आहे, मायक्रो फायनान्स चे अर्थसहाय्य सावकारीचे स्वरूप घेत चालले आहेत, एखाद्या कर्जदार महिलेने वेळेवर कर्जाचा हप्ता भरला नाही तर तिला अपमानास्पद वागणूकीला ही सामोरे जावे लागत आहे. अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी करून वसुली होत असतानाही कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या महिला होत असलेल्या पिळवणुकीच्या व्यथा जनतेसमोर मांडू शकत नाहीत, त्यामुळे प्रत्येक कुटुंब कर्जाच्या ओझ्याखाली दाबला आहे. खासगी फायनान्स कंपन्यांना नियमावली ठरवून दिली आहे, तरीही अत्यल्प व्याज आकारणी केली जात आहे, असे सांगून त्या आड खासगी कंपन्या मनमानीपणे व्याजाआकारणी करून वसुली करीत आहेत, एवढ्यावर न थांबता व्याजावर व्याज लावण्याचा धडाका देखील सुरू करण्यात आला असल्याचे जनतेतून बोलल्या जात आहे. नियमानुसार किती व्याज आकारणी करण्यात आली आला, अशी कर्जदारांनी विचारणा केली तर याबाबत कर्जदारांना माहिती न देताच अर्जावर कर्जदाराची स्वाक्षरी घेतल्यानंतर मात्र नवीन नियम लावले जात आहेत, बहुतांश कंपनीकडून प्रत्यक्ष व्यवहार होताना नियम अटी शर्ती पाळल्या जात नाहीत, हे वास्तव्य सर्वश्रुत असूनही या प्रकारावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा मात्र डोळ्यावर पट्टी बांधून कंपन्यांच्या सावकारी ला खतपाणी घालत आहे.

## वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते रास रंग दांडियाचे उद्घाटन



लातूर : प्रतिनिधी –शहरातील ग्यानदेव मंगल कार्यलयात रास रंग दांडियाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्साा हस्ते रास रंग दांडियाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी विलासराव देशमुख फराऊंडेशनच्या समन्वयक संगिता मोळवणे, उपजिल्हाधिकारी आहिल्या गाठाळ, शैलजा निटूरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी सर्वांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देऊन रास रंग दांडियामध्ये सर्वांनी सहभा गी होऊन आनंदोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. याप्रसंगी भक्ती नावाडे, सीमा लोहारे, कल्पना जाधव, स्पनिल लोहारे, प्रा. सोहेल शेख, दीपक नावाडे, संतोष लोहारे,सर्व्हेस लोहारे,स्वप्निल हापसे,विशाल पटने,अनिकेत हापसे, हर्षदा राठोड, डॉ. काळदाते मॅडम आदी उपस्थित होते.

# माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही._ एम. के. गांधी

### फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने गांधीं जयंती दिनी २ आक्टोबरला द्वितीय गोलमेज परिषदेतील माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. या गांधीच्या विधानावर साप्ताहिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना कष्टकऱ्यांचे नेते सुभाष लोमटे म्हणाले की, आपण ज्या परिवर्तनवादी विचारांचा जागर करू इच्छितो त्याच विचारांना आपले लोकप्रतिनिधी संपविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पहायला मिळत आहे. मनुस्मृतीचा आधार चातुर्वर्ण्य तर अस्पृश्यता हे चलन होते. ज्यात शिक्षण, संपत्ती व शस्त्र धारण करण्यास बंदी घातली होती. प्रस्थापित उच्चवर्णीयांची विनामोबदला चाकरी करण्याचे काम मागासवर्गीयांकडे येत होते, केवळ शिळ्या भाकरी मिळविण्यासाठी होय. म्हणून केवळ सोयीचे नव्हे! तर कठोर मंथनाची आवश्यकता आहे. जनतेचे जगण्याचे प्रश्न ऐरणीवर आणले पाहिजेत. किमान वेतन, पेंशन, ग्रॅच्युइटी, हक्काचे घर कामगारांना सुद्धा मिळालेच पाहिजे. लाडकी बहीण योजना ही निवडणूक जिंकण्यासाठी केलेला भ्रष्टाचारच होय. आंतरजातीय विवाहांना हजर राहण्याचा गांधींनी निर्धार केला होता. आंबेडकरांना अपेक्षित असे सर्वच तत्व भारताचे संविधानात अंतर्भूत करता आले असे नाही. पुणे कराराच्या वेळी डॉ. आंबेडकरांची भूमिका दूरदृष्टीची होती. आपल्या कुटुंबाला सुद्धा लोकशाही मान्य नसते म्हणजे कुटुंब सुद्धा लोकशाही विरोधी असते. भिन्न विचार मांडणे हा गुन्हा नाही तर त्याचा आदर करून विचार केला पाहिजे.

याप्रसंगी अन्वर अलमनूर जाफर म्हणाले की, वाद प्रतिवाद चर्चा व्हायला पाहिजे सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. सरणासाठी लाकडे मिळत नसणाऱ्या व्यवस्थेत पाण्याच्या माठाला हात लावला म्हणून विद्यार्थी मारला जातो तर आधारवरील अंगठ्या अभावी रेशन न मिळाल्याने भात भात करीत मुलींचा जीव जातो, अशा परिस्थितीत इतिहास आपल्या हातात नसले तरी भविष्य घडविणे आपल्या हातात आहे. म्हणून भविष्याच्या विकासात्मक ब्ल्यू प्रिंट वर चर्चा केली पाहिजे. एड. प्रविण जाधव म्हणाले की, मन जन्मताच तर बुद्धी नंतर विकसित होते. व्यक्तीच्या उद्देशाला मारक असणारे विचार बुद्धिला पटत नसतात. सागर भगत म्हणाले की,



सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण दिले पाहिजे. संघराज धर्मकिर्ती म्हणाले की, मन हे अतिशय चंचल असते तर बुद्धिला विकसित करावे लागते. बहुजनांचे स्वायत्त राजकारण निर्माण केले पाहिजे. इंजिनिअर हिरामण पाटील म्हणाले की, साहित्य वाचायचे असेल तर केवळ लोकमान्य बाबासाहेबच समजून घेतले पाहिजे. अज्ञानातील आनंद ही एक गुलामगिरीच होय. आपल्या समाजातील महिला कृतघ्न आहेत, ज्यांना आरत्या पाठ आहेत पण फुले शाहू आंबेडकरांवर दोन मिनिटे बोलता येत नाही. गांधीनी आंबेडकरांच्या चळवळीचे फार नुकसान केले आहे. बाबासाहेबांचे ग्रंथ हेच आमचे गुरू आहेत. पी. आर. बामने म्हणाले की, मनाला पटते पण बुद्धीला पटत नाही असे म्हणणे हे आत्मघातच आहे. गांधी हे खेड्याकडे तर आंबेडकर शहराकडे चला असे म्हणतात, याचे मर्म समजून घेतले पाहिजे. आंबेडकरांचा प्रेममुलक संदेश रमा होती तर गांधीचा द्वेषमुलक संदेश राम होता. गंगाधर जोंधळे म्हणाले की, व्यावसायिक जीवनासह आर्थिक स्थैर्य राखून समाजात मिसळून समाजासाठी कार्य केले पाहिजे. जी. एस. दोडवे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी दादरच्या हिंदू सोसायटीत घर का घेतले असावे? याचे मर्म समजून घेतले पाहिजे. दिशा ठरवून कृती केली पाहिजे. आवड तिथे सवड याप्रमाणे चळवळीसाठी वेळ दिला पाहिजे. घेणारा हा लाचार तर देणा–यात स्वाभिमान जागृत असतो. तोडणा–यापेक्षा जोडणारा महान असतो. सनदशीर जहाल मार्गाने पुढे गेले पाहिजे. गौतम पारखे म्हणाले की, समाजाला शोषणातून बाहेर काढण्यासाठी कार्य केले पाहिजे. मताचा योग्य वापर करून डॉ. आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे शासनकर्ती जमात व्हायच्या दिशेने मार्गक्रमण केले पाहिजे. बी. जे. कान्हेकर म्हणाले की, डॉ आंबेडकरांनी देशातच नव्हे! तर विदेशात जाऊन उच्च दर्जाचे शिक्षण घेतले आणि न्यायाधीश पदाची नौकरी नाकारली ते केवळ समाजाच्या उद्धारासाठी होय. एका काळात शूद्रांना रस्त्यांने चालण्यास बंदी होती. करिता शूद्र पूर्वी कोण होते? याचा शोध घेतल्यानंतर त्यांनी समस्या निर्मूलनासाठी प्रखर लढा दिला.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केलेल्या आहेत. मित्र हो, विषय पुढे आला कसा? याची पार्श्वभूमी समजून घेतली तर लक्षात येते की, पहिल्या गोलमेज परिषदेला गांधीं उपस्थित नसल्याने तिथे काय घडले? याची जाणीव त्यांना नव्हती म्हणून ती जाणीव करून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी द्वितीय गोलमेज परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत ताप आल्याचे कारण सांगून पूर्वी बोलण्याची संधी मिळावी अशी सभाध्यक्ष चँसेलर यांना विनंती केली होती. त्यामुळे आंबेडकरांनी सविस्तर दीड तास भाषण दिले व ते निघून गेले. परिणामी पुढे काय चर्चा झाली? असेल याची कल्पना नसल्याने ते जाणून घेण्यासाठी उत्सूक असताना रात्री बारा वाजता पहिल्या दिवसाच्या कार्यवाहिचा अहवाल आला त्यात गांधींचे वाक्य सुरूवातीलाच नमूद करण्यात आले होते. ते असे की, माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. म्हणून या विरोधाभासी विधानावर गांधी जयंती दिनी आपण चर्चा करीत आहोत. मते मतांतरे असू शकतात. परंतु विरोधी मताचा सन्मान करून संदर्भासहीत नेमके काय ते समजून घेतलेच पाहिजे. करिता डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले काँग्रेस व गांधीं यांनी अस्पृश्यांसाठी काय केले आहे? या पुस्तकाचे मर्म समजून घेतले पाहिजे. आणि वर्तमान शासकांना स्वातंत्र्यापासून त्यांनी या देशातील सामान्य नागरिकांच्या उत्थानासाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण व बेरोजगारीच्या अनुषंगाने नेमके काय केले आहे? याची शहानिशा केली पाहिजे. त्यावर जनमत तयार करून योग्य ते परिवर्तन घडवून आणले पाहिजे. भारताचे संविधान या अनुषंगाने व्यक्त होतांना भारतापासून संविधानाला वेगळे करून एकेरी उल्लेख करू नये. ज्याची अनुमती भारताचे संविधान प्रदान करीत नाही. उलटपक्षी ते कलम ३९३ चे उल्लंघन आहे. द्वितीय गोलमेज परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत गांधीं म्हणाले होते की, माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. यावर दुसऱ्या दिवशी डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षांच्या अनुमतीने प्रज्येचे प्रतिनिधी संस्थानिकांनीच पसंत करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने बोलण्याची त्यांना अनुमती मिळाली आहे काय? कॉन्झर्व्हेटीव्ह पार्टीला हव्या असलेल्या निवडणुकांना सर्वांचा विरोध असताना गांधींने ते का मान्य केले आहे? असे प्रश्न विचारले होते ज्यांला गांधींनी प्रत्युत्तर दिले नाही. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, जातीय प्रश्न क्षितिजावर दिसू लागल्यापासून आपल्या सार्वजनिक आयुष्यात गांधींनी जर काही केले असेल तर ते अस्पृश्यांकडे दूर्लक्ष करणे हेच होय. या सर्व घडामोडीवर उपाय योजना म्हणून जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा होय. या अनुषंगाने वर्तमानात आपण कुठे आहोत? काय कमावले आणि काय गमावले? याची जाणीव व्हावी म्हणून जाणीवपूर्वक या विधानाच्या अनुषंगाने जाणीवपूर्वक चर्चा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके व आभार धनराज गोंडाणे यांनी व्यक्त केले. प्रवीण साळवे यांनी 'असे आले किती नी गेले किती' हे गीत सादर केले होते. या कार्यशाळेला गंगाधर जोंधळे, प्रवीण साळवे, प्रा. मंगला झिने, गौतम पारखे, इंजिनिअर किशोर पाटील, जी. एस. दोडवे, बी. बी. मुजमुले, संघराज धर्मकिर्ती, सुनील बोबडे, एड. प्रवीण जाधव, पी. आर. बामणे, बी. जे. कान्हेकर, सागर भगत, एस. ए. कानडे, अन्वर अलमनूर जाफर, धनराज गोंडाणे, सुभाष लोमटे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# समाजाची जान समाज एकता अभियान



विनोद विरघट सतिश प्रघणे सतिश घनबहादुर

पुणे: समाज एकता अभियान हे समाजातील सामाजिक व राजकीय ऐक्यासोबतच शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात भरिव असे काम करत आहे.सतिश प्रघणे सर, विनोद विरघट सर सरांच्या कल्पनेतुन निर्माण झालेले समाज एकता अभियान चे रुपांतर आता मोठ्या वृक्षामध्ये होताना दिसत आहे. समाजातील प्रगत, जागृत व सुशिक्षित व्यक्तीला सोबत घेऊन एकमेकांच्या सहकार्या शिवाय कोणतेही काम यशस्वी होत नाही म्हणून ऐक्य व ऐक्याची ताकद आवश्यक असते. समाजातील सध्याचे बेकिचे राजकारण आणि स्वार्थी व स्वंयघोषीत नेते बघीतले तर समाजाची जान कोणाला आहे हा खुप गहण विषय आहे. परंतु समाज एकता अभियान अंतर्गत सतिश प्रघणे सर व विनोद विरघट सरांच्या माध्यमातून समाजातील ऐक्य साधन्या सोबतच समाजातील गरजु लोकांना आधार देण्याचे काम केले जात आहे. शैक्षणिक व वैद्यकीय आधार देण्यासाठी सदैव समोर असलेले व्यक्तीमत्व म्हणजे विनोद विरघट सर, सतिश प्रघणे सर व सतिश घनबहादूर सर होत. समाजात दोन केळी आणि वही पेन देऊन गरीबांचे फोटो सार्वजनिक करून स्वतःला महान ठरविण्याच्या स्पर्धेत समस्या तशास राहून जात आहेत. परंतु समाज एकता अभियान चे पदाधिकारी व दानशूर व्यक्ती कोणत्याही प्रसिद्धी चा मोह न करता गरजु लोकांना सढळ हाताने आधार देण्याचे काम करत आहेत. आज पर्यंत निरापराध तरुणांना तुरुंगातून बाहेर काढण्या पासुन तर रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांना मदतीचा हात देऊन आधार देण्याचे अनेक समाज एकता अभियान द्वारे केले गेले आहेत. आताही छ. संभाजी नगर येथील एका खाजगी रुग्णालयात एक तरुण वैद्यकीय उपचार घेत आहे त्याच्या वैद्यकीय उपचारासाठी सतिश प्रघणे सर, विनोद विरघट सर, सुमेध घनबहादुर सर व सतिश घनबहादुर सर यांच्या नियोजनाखाली जागृत व सुशिक्षित मान्यवरांकडून मदत जमा करण्यात आली त्यामध्ये आयु. विनोद विरघट सर,आयु. सतिश प्रघने सर, आयु. एस. यु. खंडारे सर, आयु. सुजीत रणधीर सर, आयु . सुमेध घनबहादुर सर, आयु . साहेबराव इंगळे सर,आयु . सुनील खोब्रागडे सर, आयु . सतिशघनबहादुर सर, आयु. प्रकाश दारोकार सर, आयु . विकास लहाने सर, आयु . विनोद मोहोड सर, आयु . सचिन गावंडे सर, आयु . अमोल घाटविसावे सर, आयु . सुमित नकाशे सर, आयु. पांडुरंग तारू सर यांचाही समावेश आहे. झाडाचे कोणते पान किती सावली देते याचा हिशोब नसतो. पण कोणते झाड किती सावली देते याचा एकंदरीत हिशोब असतो. आणि समाजातील गरजु घटकाला सावली देण्याचे काम समाज एकता अभियान करत आहे.

# स्व. नंदकिशोरजी भार्गव शिक्षण अभियानांतर्गत आयोजित आंतर शालेय निबंध स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर :– येथील अभिनव मानव विकास शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वतीने स्व. नंदकिशोरजी भार्गव शिक्षण अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या आंतर शालेय निबंध स्पर्धे स शनिवारी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, चैतन्य श्याम भार्गव , संस्था सदस्य डॉ. रमेश जाजू, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या स्पर्धेत केवळ इयत्ता सातवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी होउ शकणार होते. त्यादृष्टीने शहरातील विविध शाळांना आपल्या शाळेतून प्रत्येकी दोन विद्यार्थी पाठविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार निवडक विद्यार्थ्यांच्या सहभागाने ही आगळीवेगळी स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी मोबाईलचे मायाजाल, शोभेपुरता निसर्ग, डॉक्टर, इंजिनिअर की पलीकडे असे तीन विषय देण्यात आले होते. या तीन पैकी कोणत्याही एका विषयावर किमान ५०० शब्दात निबंध लिहावयाचा होता . स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय अशी रोख पारितोषिके व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये शालेय अभ्यासाशिवाय त्यांना वास्तवतेचे भान आणि जाणीव व्हावी या उद्देशाने सदर निबंध स्पर्धेचे आयोजन




करण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने गुलाबाचे रोप वाटप करून सहभागी प्रमाणपत्रे देण्यात आली.स्पर्धेस अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या अभिनव उपक्रमाचे शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर , कोषाध्यक्ष जयेश बजाज यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या मराठी विभागाचे सर्व शिक्षक वृंद व पर्यवेक्षक राहुल पांचाळ, सुनीता जाधव यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE